## जनसंपर्क विभाग

**बातमी क्र.1**

जळगाव (दि.३०):- संभाषण कौशल्य, वक्तृत्व कला आणि नेतृत्व गुण आत्मसात करण्यासाठी रेडिओवरील विविध कार्यक्रम तरूणांनी नियमित ऐकले पाहीजे. व्यक्तीमत्व विकासासाठी ते महत्वाचे असून रोजगाराचे नवे दालन एफ.एम. रेडिओच्या आगमनाने निर्माण झाले आहे. असे मत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्रा.डॉ. नितीन बारी यांनी कार्यशाळेत व्यक्त केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या जनसंवाद आणि पत्रकारिता विभागातर्फे रेडिओ कार्यक्रम निर्मिती, वृत्तसंपादन आणि कौशल्य या विषयावर विद्यापीठस्तरीय द्विदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. दि. ३० ऑगस्ट रोजी या कार्यशाळेचे उद्घाटन करतांना व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्रा.डॉ.नितीन बारी बोलत होते. यावेळी विचारमंचावर आकाशवाणीचे जिल्हा वार्ताहर राजेश यावलकर, भारतीय संरक्षण मंत्रालयाच्या मुंबई विभागाचे जनसंपर्क अधिकारी व आकाशवाणीचे माजी वृत्तनिवेदक नरेंद्रकुमार विसपुते, विभागप्रमुख डॉ.तुकाराम दौड, डॉ.सुधीर भटकर, डॉ.विनोद निताळे उपस्थित होते.

पुढे बोलतांना प्रा.डॉ. नितीन बारी म्हणाले, आजचा विद्यार्थी हा टेक्नोलॉजीमध्ये पुढे आहे. रेडिओ हे जरी पारंपारिक माध्यम असले तरी तंत्रज्ञानाच्या विस्तारामुळे इंटरनेटच्या साहाय्याने मोबाईलवर देखील ते ऐकता येते. रेडिओची लोकप्रियता ओळखूनच भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आकाशवाणीवर मन की बात या कार्यक्रमातून लोकसंवाद नियमितपणे साधतात यावरूनच रेडिओचे महत्व अधोरेखित होते. सोशल मीडियाच्या युगात रेडिओवरून कार्यक्रम ऐकणाऱ्यांची संख्या ही वाढतच आहे. त्यामुळे रेडिओ या माध्यमात रोजगाराच्या नवीन संधी तरूणांना उपलब्ध होत आहे. या संधी ओळखून विद्यार्थ्यांनी रेडिओ कौशल्य आत्मसात करणे काळाची गरज ठरत आहे. असेही ते त्याप्रसंगी म्हणाले.

उद्घाटनानंतर आयोजित पहिल्या सत्रात आकाशवाणीचे जिल्हा वार्ताहर राजेश यावलकर यांनी रेडिओसाठी क्षेत्रीय बातमी संकलन, लेखन, निवेदन आणि जिल्हा वार्तापत्र लेखन व सादरीकरण या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना सांगितले की, रेडिओ हे अत्यंत संवेदनशील माध्यम आहे. त्यामुळे या माध्यमाची हाताळणी काळजीपूर्वक करावी लागते. रेडिओसाठी बातमी लेखन करतांना ते कमी शब्दात आणि सोप्या भाषेत करणे गरजेचे आहे. कारण श्रोत्यांना ती घटना आवाजाच्या माध्यमातून सांगितल्या जाते. रेडिओ क्षेत्रात वार्ताहर म्हणून करिअर करतांना विद्यार्थ्यांनी या माध्यमाचे कौशल्य त्यामुळेच प्रयत्नपूर्वक आत्मसात करणे गरजेचे आहे असेही ते पुढे म्हणाले.

कार्यशाळेत दुपारी आयोजित दुसऱ्या सत्रात आकाशवाणी जळगाव केंद्राचे वरिष्ठ उद्घोषक श्रीकांत दाणी यांनी रेडिओ कार्यक्रम निर्मिती लेखन आणि उद्घोषणा कौशल्य या विषयावर मार्गदर्शन करतांना ते म्हणाले, आकाशवाणीसाठीची कार्यक्रम निर्मिती हा एक नवनिर्मितीचा आनंद असतो. कार्यक्रम निर्मिती करतांना अनेक गोष्टींचे भान ठेवावे लागते. तर लेखन करतांना लोकजागृती, लोकशिक्षण यासोबतच मनोरंजन होईल या बाबी लक्षात ठेवावे लागतात. उद्घोषणा हे कौशल्याचेच काम आहे. कारण उद्घोषणा करतांना अष्टावधानी असणे आवश्यक असते. चुकीची उद्घोषणा होणार नाही याची काळजी घ्यावी लागते. कारण चुकीच्या उद्घोषणेचे परिणाम मोठ्या प्रमाणावर होऊ शकतात असेही ते म्हणाले. याप्रसंगी त्यांनी रेडिओ कार्यक्रम निर्मिती, लेखन व उद्घोषणा कौशल्य या विषयी विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकासह सविस्तर असे मार्गदर्शन केले.

कार्यशाळेच्या उद्घाटन सत्राचे प्रास्ताविक करतांना डॉ. सुधीर भटकर यांनी कार्यशाळा आयोजनामागील भूमिका विषद केली. अध्यक्षीय समारोप डॉ.तुकाराम दौड यांनी केला. प्रास्ताविक प्रथम वर्षाचा विद्यार्थी जीवन चव्हाण याने तर आभार मुरलीधर सपकाळे याने मानले. कार्यशाळेला जनसंवाद आणि पत्रकारिता विभागातील प्रथम व द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांसोबतच भाषा प्रशाळा, सामाजिकशास्त्रे प्रशाळा आणि समाजकार्य विभागातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दि. ३१ ऑगस्ट रोजी तृतीय सत्रात सकाळी १०.३० वाजता भारतीय संरक्षण मंत्रालयाच्या मुंबई विभागाचे जनसंपर्क अधिकारी व आकाशवाणीचे माजी वृत्तनिवेदक नरेंद्रकुमार विसपुते हे रेडिओ बातमी निर्मिती प्रक्रिया व निवेदन कौशल्य या विषयावर प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन करणार आहेत. तर चौथ्या सत्रात दुपारी २.३० वाजता ९४.३ माय एफ.एम. जळगावचे आर.जे.अभय हे एफ.एम.रेडिओ केंद्राची रचना, व्यवस्थापन आणि कार्यक्रम निर्मिती व कौशल्य या विषयावर तर आर.जे.तेजस्विनी या रेडिओ जॉकी- कार्यपध्दती व कौशल्य या विषयावर प्रात्यक्षिकासह विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहे. दुपारी ४.०० वाजता कार्यशाळेचा समारोप व्यवस्थापन परिषदेचे राज्यपाल नियुक्त सदस्य दिलीप रामू पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.

-----

**बातमी क्र.२**

जळगाव दि.३० ( ) नॅशनल ॲकॅडमिक डिपॉझिटरी (NAD) अंतर्गत पदवी प्रमाणपत्रांची नाव नोंदणी व डिजीलॉकर संदर्भात विद्यार्थ्यांना माहिती व्हावी, यासाठी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात कार्यशाळा घेण्यात आली.

पान नं.२ वर

भारत सरकारने डिजीटल इंडिया अंतर्गत मानव संसाधन विकास मंत्रालय व युजीसी यांच्या संयुक्त विद्यमाने नॅशनल ॲकॅडमिक डिपॉझिटरी (NAD) ही प्रणाली कार्यान्वित केली आहे. यात विद्यार्थ्यांचे शैक्षणिक प्रमाणपत्र डिजीटल स्टोअर करता येणार आहे. त्यासाठी विद्यापीठाने एनएसडीएल या कंपनीशी करार केला आहे. विद्यापीठ प्रशाळांमधील सर्व विद्यार्थ्यांना या प्रणालीची माहिती व्हावी व विद्यार्थ्यांनी त्यांची नाव नोंदणी कशी करावी याच्या प्रात्यक्षिकांसाठी २७ ऑगस्ट रोजी कार्यशाळा घेण्यात आली. १ ऑगस्टपर्यंत ही कार्यशाळा सुरु राहणार आहे. एनएसडीएलचे प्रतिनिधी प्रवीण पाटील यांनी मार्गदर्शन केले. ऑनलाईन परीक्षा केंद्रात विद्यार्थ्यांची गटनिहाय नोंदणी करण्यात आली. या कार्यशाळेसाठी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक प्रा.ए.बी.चौधरी यांनी मार्गदर्शन केले. पध्दती विश्लेषक डॉ.विनोद पाटील यांनी विद्यार्थ्यांना गटनिहाय माहिती दिली.

-----

**बातमी क्र.3**

जळगाव दि. ३० ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या बहि:स्थ विभागाच्या पदवी व पदव्युत्तर शिक्षणक्रमांच्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेस ३० सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

तळागाळातील व्यक्ती शिक्षणापासून वंचित राहून नये तसेच काही कारणास्तव शिक्षण अपूर्ण राहिले असेल अशा सर्वांसाठी बहिस्थ पध्दतीने प्रवेश सुरु करुन शिक्षण प्रवाहात ग्रामीण जनतेला प्राधान्याने उच्च शिक्षणापर्यंत जाण्याची संधी उपलब्ध करुन देण्यासाठी कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांनी पुढाकार घेतला आहे.

या विभागातर्फे बी.ए., बी.कॉम (सामान्य विषय) तर मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र, इतिहास, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, संरक्षण व सामरिकशास्त्र हे विषय घेवून एम.ए. करता येईल आणि एम.ए.(शिक्षणशास्त्र), एम.कॉम., एल.एल.एम.(कायदा व विधी) हे अभ्यासक्रम देखील करता येणार आहे. या अभ्यासक्रमासाठी विद्यार्थी, गृहणी, नोकरी व व्यवसाय करणाऱ्या महिला, विविध क्षेत्रातील कर्मचारी (शासकीय/निमशासकीय), व्यावसायिक, सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींना या अभ्यासक्रमास प्रवेश घेता येईल. अधिक माहितीसाठी कार्यालयाचे फोन क्र.०२५७-२२५७४९५/२२५८४९६ या क्रमांकावर संपर्क साधावा. अथवा विद्यापीठाच्या संकेतस्थळावर संपूर्ण माहिती पाहता येईल,अशी माहिती प्रभारी संचालक प्रा.ए.बी.चौधरी यांनी दिली.

---

जा.क्र. : कबचौउमवि/16/हस्तदेय /2018 दिनांक : 30 ऑगस्ट, 2018

प्रति,
**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकात प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
जनसंपर्क अधिकारी यांच्या करिता